# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/ ३४०९
कोल्हापूर- ४१६ ००४
दिनांक- ०५/११/२०२४

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा/ सांगली / कोल्हापूर.

**विषय:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) फेब्रु.- मार्च २०२५ परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याच्या नियमित शुल्काच्या तारखांना मुदतवाढीबाबत व विलंब शुल्काच्या तारखांबाबत.**

**संदर्भ:- १) राज्यमंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-३/३८८३ दि.०३/१०/२०२४ चे प्रकटन**
**२) राज्यमंडळ, पुणे यांचे क्र. रा.मं./परीक्षा-३/४३४६ दि.०४/११/२०२४ चे प्रकटन**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, संदर्भ क्र.२ नुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) फेब्रु.-मार्च २०२५ परीक्षेची आवेदनपत्रे भरण्यासाठी नियमित शुल्काने **दि.०६/११/२०२४ ते १९/११/२०२४ व विलंब शुल्काने दि.२०/११/२०२४ ते ३०/११/२०२४** अशी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी या पत्रासोबत प्रकटन जोडण्यात आलेले आहे. त्यानुसार सर्व शाळांनी विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरावीत.

तसेच माध्यमिक शाळांनी वितरण केंद्राकडे **बुधवार दि.०४/१२/२०२४ रोजी** प्रिलिस्ट जमा करावी. प्रिलिस्ट जमा करताना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) प्रिलिस्ट जमा करताना फक्त त्रुटी असलेल्या प्रिलिस्टच मंडळाकडे जमा करावीत. तसेच प्रिलिस्ट जमा करताना त्रुटी असलेल्या ठिकाणीच लाल शाईने योग्य दुरुस्ती दर्शवावी.
२) पुनर्परिक्षार्थी (Repeater),तुरळक विषय (Isolated), श्रेणीसुधारद्वारे (CIS) परीक्षेस आवेदनपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यांची पूर्वीच्या सर्व परीक्षांच्या गुणपत्रिकांच्या साक्षांकित छायाप्रतीवर आवेदनपत्र क्रमांक दर्शवून स्वतंत्र संच करुन जमा करावीत.
३) Excell यादी व चलनाची यादी स्वतंत्र जमा करावीत.
४) विहित मुदतीमध्ये प्रिलिस्ट, Excell यादी व चलन जमा न केल्यास नियमानुसार दंडात्मक शुल्क आकारले जाईल, याची नोंद घ्यावी.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

सोबत:- राज्यमंडळ,पुणे यांचे दि.०४/११/२०२४ चे प्रकटन

प्रत- सर्व वितरण केंद्र प्रमुख- आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळांचे दि.०४/१२/२०२४ रोजी साहित्य स्विकारण्याची कार्यवाही करावी व **शुक्रवार दि.०६/१२/२०२४ रोजी सर्व साहित्य विभागीय मंडळामध्ये जमा करावे.**

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं. ८३२–ए, फा. प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा.मं./परीक्षा–३/ ४३४५
पुणे – ४११००४
दिनांक – ०४/११/२०२४

प्रति,

१ मा.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ४०००३२.
२ मा.विभागीय प्रसिध्दी उपसंचालक, पुणे / नागपूर / छ.संभाजीनगर / मुंबई / कोल्हापूर / अमरावती / नाशिक / लातूर / कोकण.
३ मा.संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई – ४०००३०.
४ मा.संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र नवीन प्रसारण भवन,बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई४०००२०.
५ मा.संचालक, आकाशवाणी केंद्र,
पुणे / नागपूर / छ.संभाजीनगर / मुंबई / जळगांव / रत्नागिरी / सांगली / कोल्हापूर / सातारा / सोलापूर / नाशिक.
६ सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी.
७ मा. संपादक, सर्व वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या.

**विषय – माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु–मार्च २०२५ परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या नियमित शुल्काच्या तारखांना मुदतवाढीबाबत व विलंब शुल्काच्या तारखांबाबत.**

महोदय,

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु–मार्च २०२५ परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या नियमित तारखांना मुदतवाढीबाबत व विलंब शुल्काच्या तारखांचे प्रकटन या पत्रासोबत जोडले आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी त्यांच्या वृत्तपत्रात / प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

( देविदास कुल्लाळ )
सचिव,
राज्य मंडळ, पुणे – ०४

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी –

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे / नागपूर / छ.संभाजीनगर / मुंबई / कोल्हापूर / अमरावती / नाशिक / लातूर / कोकण विभागीय मंडळ.
पुणे / नागपूर / छ.संभाजीनगर / मुंबई / कोल्हापूर / अमरावती / नाशिक / लातूर / कोकण विभागीय मंडळ, यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे व सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे
३) अस्वीस, सस्वीस, राज्य मंडळ, पुणे.
४) ऑनलाईन विभाग, राज्य मंडळ, पुणे
५) लेखा विभाग, राज्य मंडळ, पुणे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर –

१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०००३२.
२) मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, शिक्षण आयुक्त कार्यालय, मध्यवर्ती इमारत, पुणे – ४११००१.

E:\Pardeshi1\Avedanpatra\FebMar25\SSC.docx12

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–०४

॥ प्रकटन ॥

## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु–मार्च २०२५ परीक्षेची आवेदनपत्रे सादर करावयाच्या नियमित शुल्काच्या तारखांना मुदतवाढीबाबत व विलंब शुल्काच्या तारखांबाबत

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) फेब्रु–मार्च २०२५ परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे Saral Database मधून ऑनलाईन पध्दतीने त्यांचे शाळा प्रमुखांमार्फत भरावयाची आहेत.

तसेच पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेऊन प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने त्यांच्या शाळा प्रमुखांमार्फत दिनांक ०५/११/२०२४ पर्यंत भरावयाची होती. सदर नियमित शुल्काच्या तारखांना मुदतवाढीबाबत व विलंब शुल्काच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे –

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी परीक्षा शुल्क RTGS द्वारे भरणा करणे व RTGS/NEFT पावती/चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करावयाची तारीख |
|---|---|---|
| नियमित शुल्क (मुदतवाढ) | बुधवार, दिनांक ०६/११/२०२४ ते मंगळवार, दिनांक १९/११/२०२४ | बुधवार दि.०४/१२/२०२४ |
| विलंब शुल्क | बुधवार, दिनांक २०/११/२०२४ ते शनिवार, दिनांक ३०/११/२०२४ | |

सर्व माध्यमिक शाळांनी आवेदनपत्रे भरण्यापूर्वी School Profile मध्ये शाळा, संस्था, मान्यताप्राप्त विषय, शिक्षक यांच्याबाबतची योग्य माहिती भरुन मंडळाकडे पाठविणे आवश्यक आहे. सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन SUBMIT केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांच्या लॉगिन (School Login) मधून Pre-List उपलब्ध करुन दिलेली असेल. माध्यमिक शाळांनी त्याची प्रिंट काढून विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत मुख्याध्यापक यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

इ. १० वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळेमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक यांनी खालील महत्त्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे –

१. सर्व माध्यमिक शाळांनी Website द्वारे प्राप्त Online चलनावर नमूद केलेल्या ICICI बँकेच्या Virtual Account मध्ये कोणत्याही बँकेमधून RTGS/NEFT द्वारे चलनाप्रमाणे अचूक शुल्क रकमेचा भरणा करण्यात यावा व चलनाची प्रत व Pre-list विहित मुदतीमध्ये विभागीय मंडळास जमा करावी.
२. यापूर्वी वापरात असणाऱ्या Bank Of India/ HDFC Bank/Axis Bank च्या जुन्या चलनांचा वापर करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे मंडळात रोख स्वरूपात शुल्क स्विकारले जाणार नाही.
३. माध्यमिक शाळांनी सादर केलेली सर्व आवेदनपत्रांचे विहीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत.
४. विलंब शुल्काने आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.
५. अतिविलंब शुल्काने आवेदनपत्रे भरण्याच्या तारखा यथावकाश कळविण्यात येतील.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

दिनांक – ०४/११/२०२४

E:\Pardeshi1\Avedanpatra\FebMar25\SSC.docx13